- प्रकरण दुसरे -

## दलित कथेचे शिल्पकार : श्री शंकरराव खरात यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व

पृष्ठ क्रमांक 18 ते 24

## प्रकरण दुसरे

## दलित कथेचे शिल्पकार : श्री शंकरराव खरात यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व

### परिचय :-

अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव यांच्या समकालीन लेखन करणारे शंकरराव खरात हे प्रारंभीच्या काळातील एक प्रमुख कथाकार. शंकरराव खरातांचा एका महार कुटुंबात 11 जुलै, 1921 रोजी आटपाडी (जि. सांगली) येथे जन्म झाला. घरची अत्यंत गरीब परिस्थिती, आई-वडील गावकीचं काम करून कसेतरी पोट भरत होते. अशा गरीब परिस्थितीतही शंकरराव खरातांनी आपले शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या युनियन बोर्डिंगमध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांना कर्मवीरांच्या विचाराने भारावुन टाकले. स्वावलंबन व परिश्रम याचे महत्व व मोल त्यांनी समजून घेतले. या सर्व गोष्टीचा परिणाम त्यांच्या पुढील जीवनाच्या घडामोडीवर झालेला आहे.

1957 च्या सार्वत्रिक निवडणूकीत शंकरराव खरातांना डावलण्यात आले. "पण त्याचवेळी माझी पक्की खात्री झाली की, प्रामाणिकपणे, निष्ठेने, कर्तव्यभावनेने कार्य करणा-या कार्यकर्त्यांचे निवडणूकीच्या राजकारणात बळी जातात. संधि-साधूंना अशी संधी दिली जाते. तरीही आपण आता कशाचीही अपेक्षा, आकांक्षा न धरता सामाजिक व राजकीय कार्य करीत राहावे. याच विचाराने मी पुढे कार्य करीत राहिलो"[1] या सर्वातून विटलेले खरातांचे मन लेखनाकडे वळले. त्याच काळामध्ये अनेक दलितेतर लेखक अस्पृश्यांच्या जीवनाविषयी कथा-कादंब-या लीहित होते. त्या खरातांच्या वाचनात येत होत्या. "कल्पनेच्या फांदीवर बसून लिहिलेली कथा कादंबरी मी जगलेल्या व भोगलेल्या माझ्या अनुभवांना पटत नव्हती. म्हणून मीच ठरविले की, दलितांच्या जीवनातील जिवंत अनुभव आपण कथा-कादंबरीच्या फॉर्ममधून लिहावेत. आपण अस्पृश्य

दलित म्हणून जगलेले भोगलेले, अनुभवलेले, खरं जीवन लिहावे, ते वाचकांपुढं मांडावे-ठेवावे. म्हणजे वाचकांना दलितांचे अस्पृश्यांचे. खरे जीवन, त्यांच्या जीवनाचे अंतरंग त्यांना कळेल. याच अंतरीच्या उर्मीने, याच एकमेव स्फूर्तीने मी वाङ्‌मय साहित्याकडे वळलो. त्यासाठी मी लेखणी हातात घेतली.[2] याच सुमारास 1956-57 च्या वर्षी 'नवयुग'च्या दिवाळी अंकात 'सतूची पडीक जमीन' या नावाची कथा प्रसिद्ध झाली. शंकरराव खरात कथा लेखक म्हणून चमकू लागले. 'माझी ही Identity माझे व्यक्तिमत्व टिकावे असा मी निष्ठेने प्रयत्न करू लागलो, साहित्याच्या नादाने मी राजकारणातूनही निवृत्त झालो.[3] दलितांच्या दु:स्थितीकडे लक्ष वेधणारे पहिल्या पिढीतले प्रमुख दलित कथाकार 'बारा बलुतेदार' (1959), 'सांगावा' (1962), 'टिटवीचा फेरा' (1963), 'सुटका' (1964), हे त्यांचे प्रमुख गाजलेले संग्रह. त्याचबरोबर 'तडीपार' (1961), 'दौंडी', 'आडगावचे पाणी', 'गाव-शिव', 'मुलाखत' हे अलिकडचे कथासंग्रह.

**बारा बलुतेदार :-**

'बारा बलुतेदार' बद्दल भालचंद्र फडके म्हणतात, 'ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे पुष्कळ असते त्याला जर प्रभावीपणे सांगता आले तर त्याच्या अनुभवाचे सोने होते. मराठी कथेतून एका विशिष्ठ जगातलेच अनुभव व्यक्त होत होते. अण्णाभाऊ साठे लिहीत तेंव्हा त्यांचे लेखन लक्ष वेधून घेई. असाच अनुभव श्री.शंकरराव खरात यांचा पहिला संग्रह 'बारा बलुतेदार' (1959) वाचला तेंव्हा आला.[4] खरातांनी रंगविलेला 'रामा महार' डोळयापुढून हलत नाही. त्याचे दु:ख म्हणजे तो ज्या दलित थरातून जन्माला आला आहे. त्या थराचे दु:ख आहे. 'पण आता महानगराच्या बकाल वस्त्यातून राहणा-या भागात दलितांवर लिहून विद्रोही दलित लेखकांना साथ देत आहेत. दलित चित्रणाच्या हेतूने त्यांचे लेखन असल्यामुळे त्यातील हेतुपुरस्परता जाणवते पण अण्णाभाऊंच्या प्रमाणे विशिष्ठ राजकीय प्रणालीची छाया त्यांच्या लेखनावर नाही.[5] दलितांच्या जीवनातील अन्याय दु:खाचे विभिन्न प्रसंग निवडून त्यांनी आपल्या कथा-विशेषता अलिकडील रचलेल्या वाटतात. तरी त्या जीवनाच्या प्रत्यक्ष व खोल अनुभव, त्यातील बारकावे, बारिक-सारीक तपशील, रचना चातुर्य, कमावलेली शैलीदार भाषा या गुणांमुळे त्यांच्या कथांतील चित्रण वास्तव व प्रत्ययकारी वाटते.

दलितांची उपासमार, अर्धनग्नता, त्यांची केविलवाणी खोपटी, त्यांना करावे लागणारे ढोरावाणी काम, गावक-यांची तुच्छ वागणूक, किडामुंगीसारखे क्षुद्र जीवन, त्याचबरोबर त्यांचे आपसातील हेवेदावे, चुरस भाऊबंदकी, गावकी-भावकी उत्सव, मेळावे असे सर्व प्रकारचे विपुल चित्रण त्यांच्या कथेत आढळते.

'बारा बलुतेदार' संबंधी भालचंद्र फडके म्हणतात, 'आपल्या जुन्या ग्रामव्यवस्थेचे आधार म्हणजे महार, मांग, रामोशी, कुंभार, चांभार, कोळी, परीट, न्हावी, सुतार, लोहार, सोनार आणि गुरव। यांच्या जीवनाभोवती गुंफलेल्या कथा वाचीत असताना एक अपरिचित एक अनोखे विश्व उलगडत होते. या माणसांच्या वेदना मनाला अस्वस्थ करीत होत्या.'[6] 'बारा बलुतेदार' मध्ये बहुतेक व्यक्तिचित्रेच आहेत त्यांत व्यक्तिशिष्ठतेपेक्षा प्रातिनिधिकताच अधिक जाणवते. त्यांची कथा नेटकी, आटोपशीर एकेरी बांधणीची असते. मथळयापासून अखेरीपर्यंत नेटकेपणे उभी केलेली, खुसखुशीत व नेमक्या संवादांनी सजवलेली एकूण कलात्मक अशी ही कथा आहे. अण्णाभाऊ साठयांच्या मानाने शंकरराव खरात यांची कलात्मकतेची जाणीव आखीव व नेटकी आहे. तिला वास्तवाचे भान आहे, अधिष्ठान आहे. अनेकवेळा त्यांच्या कथातील सत्य हे वांझोटे सत्य असते. 'कलावंतांच्या कलावंत प्रतिभेचे संजीवक किरण या कोरडया तपशिलावर पडलेले नसतात. तरी परंतु उपेक्षितांच्या जीवनातले बारकावे खरात यांनी अचूकपणे टिपले आहेत.'[7]

**प्रेरणा :-**

शंकरराव खरातांच्यासारख्या लेखकाने अनेक कथासंग्रह कादंब-या, वैचारिक ग्रंथ, आठवणी लिहिलेल्या आहेत त्यांचे वाड्.मयविषयक मत सांगणे तर अवघडच आहे. 'खरातांच्या कथेची प्रेरणा आंबेडकरी म्हणता येईल. आत्मोन्नती, स्वसुधारणा, जातिबद्ध, हिंदूधर्म त्याच्या रूढी व परंपरा यांना नकार आणि जातिनुसारी ग्रामरचना व वतनदारीविरूद्ध बंड ही आंबेडकरांच्या दलित मुक्ति आंदोलनाची प्रमुख अंगे, त्यांचे प्रतिबिंब खरातांच्या कथेत पडलेले दिसते. खरातांनी दलित साहित्याच्या उगमस्थानांचे विवेचन केले आहे. तसेच आपली प्रेरणा आंबेडकरी असल्याचेही ते सांगतात. (मिलिंद साहित्य परिषद संमेलन, 1967, अध्यक्षीय भाषण)'[8] यावरून शंकरराव खरात हे कोणत्याही वाड्.मयीन गटात वा संप्रदायात मोडणारे लेखक नाहीत, एखाद्या लोकप्रिय अशा टूमचा त्यांच्यावर प्रभाव नाही ते आधी समाजसुधारक आहेत मग लेखक.

ARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तडीपार :-

"तडीपार" हा त्यांचा दुसरा कथासंग्रह असून यामध्ये खरातांनी वेगवेगळया थरातून आलेल्या भटक्या, गुन्हेगार जमीती, धंदेवाले इ. जमातींचे जग उलगडुन दाखविले आहे. "तडीपार" जीवन जगणा-या या माणसांना नैतिक बंधने नसतात त्यांना जगायचे एवढेच माहित असते. पशु पातळीवर जगणा-या या माणसांना भावना असतात. दुसरा कोणता उपाय नसतो म्हणून ते गुन्हे करतात आणि शिक्षाही बिनतक्रार भोगतात.[9] खरात हे ज्ञात जीवन अतिशय अलिप्तपणे रंगवू पाहतात. ते प्रक्षुब्ध होत नाहीत. आपल्या कथेला "सेंटीमेंटल" होवू देत नाहीत मात्र दलितांचे जीवन दु:ख रोखठोकपणे उभे करतात. "खरातांचा दलित माणूस पिचलेला आहे, असहाय्य आहे, आकांक्षावादी आहे, लढयात उतरणारा आहे, शोषित आहे, संसारात रमणारा आहे, जिल्हयाच्या राजकारणात रंगणारा आहे, आत्मनाश करणारा आहे तसा स्वप्नाळूही आहे. कथांतून व्यक्तीरेखाटन करताना लेखक व्यक्तीभोवती सतत पहारा करीत असल्याचे जाणवत रहाते."[10] खरातांच्या कथेत भुकेचे थैमान आहे. पोटापायी नाडलेल्या लाचार माणसांची तिथे गजबज आहे. कठोर अंत:करणाची माणसे आहेत. त्यांनी दलितांच्या अस्पृश्यतेच्या दु:खाबद्दलही लिहिले आहे. त्यांची उपासमारी व अगतिकता एवढयावरच ते थांबले नाहीत.

गावशीव :-

"गावशीव" या कथासंग्रहात खरातांनी गावापासून-शीवेच्या परिसरातील माणसांचे वास्तव चित्र उभे केले आहे. स्वत:च्या अंगी असलेल्या कलेच्या आधारावर स्वत:चं जेमतेम पोट भरणारी माणसे या संग्रहात आहेत. "पोतराज, जोगतीण, आरादी, घिसाडी, मुरळी, बहुरूपी, चित्रकथी, कुरमुडया जोशी, गोसावी, वासुदेव, शेलार, गोंधळी इ. सर्व अंगच्या कला गुणांवर जगणारी माणसे. पण कोणत्याच गांवी स्थिर न राहणारी भटकी माणसे."[11] खरातांच्या कथेतील माणसे अधांतरी कुणाच्या तरी अधिपत्याखाली, जोखडाखाली जीवन जगणारी, कंठणारी माणसे आहेत. गणू हमालाचे मूल औषधाला पैसा नाही म्हणून मरते तेंव्हा सुटकेचा निश्वास टाकून तो म्हणतो, "देवा बरं केलस! भार हलका झाला. सुटका झाली!" (सुटला). तर दामू परीटाच्या आईचे वेदनामय उद्‌गार, "मरूस्तवर काम करून हे नाचारपण हटीना! देवा कधी हे नाचारपण हटील का?" तहानेने

तडफडून बेशुद्ध पडलेल्या म्हाता-याला पाहून त्याला पाणी पाजण्याऐवजी पळून गेलेला पुजारी (पाणी) ही कठोर अंत:करणाची माणसे म्हणजे दलितांवर अन्याय-उपेक्षा करणा-या समाजाची प्रतीकेच। 'उपेक्षित समाजाची दु:खे मराठीत अनेक लेखकांनी व्यक्त केली आहेत, परंतु खरातांच्या लिखाणामधील अनुभवातून जन्माला आलेली जवळीक ही कोणालाच साधलेली नाही. थोडाफार अपवाद असेल तर तो माटयांचाच.'[12]

**आडगावचं पाणी :-**

'आडगावचं पाणी' या संग्रहातील बहुसंख्य कथा याच बदलत चाललेल्या गावच्या आहेत. साळा-मास्तरीन, गरामसेविका, सरपंचाच्या घरी का म्हणून राहणार असा सवाल करणा-या पंचांनी एक तडजोड म्हणुन म्हटलं की ही गरामसेविका आपल्या प्रत्येक पंचाच्या घरी एक एक महिना राहील अन् सरपंचाच्या घरी दोन महिने - पण घडले मात्र असे की वयानं झालेली काळीकुट्ट गरामसेविका पोरांचे लटांबर घेऊन आली तेंव्हा सरपंच म्हणतात, 'सेक्रेटरी। म्होरच्या बैठकीच्या अनजिंडयावर 'आमाला ही गरामसेविका नको' असा पहिला ठराव घ्या.'

आता काळ बदलत चालला आहे. काळाबरोबर समाजही बदलत चालला आहे. नवा तरूण माणूस आता 'जोहार' घालण्याऐवजी 'जयभीम' म्हणतो. ही नवी जाग खरात आपल्या कथांतून करताना दिसतात. 'खरातांचे लिखाण वाचत असताना एक गोष्ट सारखी जाणवते. या लेखकामधील पुढारी सदैव जागृत असतो. ज्या समाजाचे ऋण घेतले आहे, त्याची जबाबदारी म्हणून त्यांनी या समाजाचे प्रश्न तळमळून मांडल्यासारखे वाटते. या तळमळीमुळे खरातांच्या लिखाणाला एकांतिकता आली आहे. जवळून न्याहाळलेल्या तपशीलाभोवती गुंफलेली एकसुरी कथानक हेच खरातांच्या लिखाणाचे वैशिष्ठय ठरते.'[13]

**सांगावा :-**

'सांगावा' मध्ये एकूण चौदा कथा आहेत. या कथांची शीर्षके ही योजकतापूर्ण पद्धतीने दिलेली आहेत. कथेचे शीर्षक हे माणसांच्या चेह-यासारखे असते. चेहरा हा संपूर्ण देहामध्ये महत्वाचा. त्यावरून तो माणूस रूपा-गुणाने ओळखता येतो. संपूर्ण कथेचा आत्मा - सार त्यातून सूचकतेने व्यक्त होते. 'सांगावा' सांगणारा रामा दिवसभर उपाशी असतो. पण त्याची कोणी चौकशी केली नाही. जमिनीचा वाटा मागणारा

गुंडिबा शेवटी नानाला वाचवतो व वाटा मागण्याचा विचार झुगारून देतो. 'माया' नावातही विविध अर्थ कसे निष्पन्न होतात, हे आपण पुढे पाहूच. नवस, पाणी, पंचनामा, भानगड इत्यादी सा-याच कथा या अशा अर्थपूर्ण आहेत. त्या नावामुळे कथेचे सूचकतेने सार समजते. कथेचा अर्थ अधिक व्यापक बनतो. त्या अर्थाला अनेक वलये लाभतात. सौंदर्याचे संपूर्ण आकलन होते. 'साकल्याने पाहिले असता खरातांची भाषा ही रूक्ष वाटते. प्रसंगाला अनुरूप असा गोडवा किंवा चित्रमयता धारण करण्याची ताकद त्यांच्या भाषेमध्ये नाही. शंकर पाटील किंवा व्यंकटेश माडगूळकर यांच्यामध्ये ही ताकद दिसून येते. खरातांच्या या उणीवेमुळे त्यांचे कथाविश्व परिणामतः तौलानिक दृष्ट्या थोडे निकस होते.'[14] तात्पर्य खरातांचे कथाविश्व उपेक्षित - बहिष्कृतांच्या व्यथा वेदना वास्तव जीवनाला मुरड घालणा-या माणसांचे आहे. माणसांच्या प्रदर्शनापेक्षा जीवनदर्शन घडविणे हा खरातांचा मुख्य हेतू आहे. त्यामुळे जळजळीतपणा, करारीपणा, फूत्कार, गुदमरणे असले प्रकार त्यांच्या कथेत येत नाहीत. कारण ती सामान्य माणसांसारखी जीवन कंठणारी माणसे आहेत. 'लेखकाचा प्रकृतीधर्म जीवन सत्याला सामोरे जाणे आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती आशयपूर्ण आहे, आवेशपूर्ण नाही. अकारण भावविवशता व उर बडवेपणा त्यांच्या कथेत नाही, हे मात्र आवर्जून उल्लेखिले पाहिजे.'[15]

खरातांच्या कथांतून स्वातंत्र्यानंतरची बदललेली गावे आहेत, नव्याने सत्ता आलेले पंच, सरपंच, सभापती, झेड.पी. वाले, मंत्री आणि त्यांच्या कृती-उक्तीतील अर्थशून्यता खरात कथापटावर मांडता आहेत. याचवेळी खरातांना दलितांत अस्मितेची ज्योत पेटलेली जाणवते. वस्तीवर आलेली 'नवी जाग' खरात कथातून साकार करतात.

शंकरराव खरातांच्या कथेचा चेहरा जरी पारंपारिक कथेचा असला तरी त्यांचा निवेदक या कथेतील घटनांचा साक्षीमात्र आहे हे मान्य करावे लागेल.

पुढील प्रकरणात त्यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहातील स्वभावरेखाटनांचा व आशय अभिव्यक्ती हळव्या कथालेखनाच्या वैशिष्ट्यांचा विचार क्रमप्राप्त ठरतो.

**संदर्भ :-**


1. शंकरराव खरात, तराळ-अंतराळ, पुणे द्वितीयावृत्ती 1988, पृ. 437-38.
2. उ. नि. पृ.438
3. उ. नि. पृ. 439
4. भालचंद्र फडके, दलित साहित्य वेदना व विद्रोह, पुणे द्वितीयावृत्ती 1989, पृ. 187.
5. इंदुमती शेवडे, मराठी कथा : उगम आणि विकास, मुंबई सुधारित आवृत्ती, 1973, पृ. 350
6. उ. नि. पृ. 187
7. संपा. प्रा. अंबादास माडगूळकर, प्रा. सूर्यकांत खाडिकर, मराठी ग्रामीण कथा, पुणे पुर्नमुद्रण 1990 पृ. 32
8. इंदुमती शेवडे, उ. नि. पृ. 351
9. उ. नि. पृ. 188
10. प्रा. गंगाधर पानतावणे, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, नागपूर पहिली आवृत्ती, 1976, पृ. 159
11. उ. नि. पृ. 192
12. उ. नि. पृ. 33
13. उ. नि. पृ. 33
14. उ. नि. पृ. 34
15. उ. नि. पृ. 167


- - -